**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई – ४०० ०३२.

क्रमांक : ८६०० / क-१,

दिनांक : ८ मे, २०१९.

**संदर्भ :-** १) कार्यालयीन परिपत्रक क्र.४१२०६/क-१, दिनांक १० ऑगस्ट, २००६.

२) कार्यालयीन परिपत्रक क्र.२१९०८/क-१, दिनांक १३ मे, २०१०.

**:: परिपत्रक ::**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (१), (२) व कलम १९ मधील तरतुदींअन्वये या सचिवालयास प्राप्त होणाऱ्या अर्जांवर त्वरेने निपटारा होण्यासाठी या सचिवालयात कक्षनिहाय अपिलीय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, सर्व कक्षांकडील माहितीच्या अधिकाराच्या कामकाजात समन्वय, सुसंगती व एकसूत्रीपणा राहण्यासाठी अपिलीय प्राधिकारी (समन्वय), माहिती अधिकारी (समन्वय) व सहायक माहिती अधिकारी (समन्वय) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त झालेल्या **'अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक कक्षांतर्फे हाताळण्यात येणाऱ्या विषयांशी संबंधित असेल तर अर्जदारास अंतिमत: एकत्रित स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची जबाबदारी ही माहिती अधिकारी (समन्वय) यांनी निश्चित करुन दिलेल्या संबंधित कक्षाच्या माहिती अधिकाऱ्याची राहील'** असे संदर्भाधीन परित्रकांन्वये या सचिवालयातील सर्व कक्षांना कळविण्यात आले आहे.

तथापि, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त काही अर्जातील माहिती ही वेगवेगळ्या कक्षांमार्फत हाताळण्यात येणाऱ्या विषयांशी निगडीत असल्यास, अर्जदारास अंतिमत: एकत्रित स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीची जबाबदारी टाळण्यासाठी काही कक्षांतील माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी मूळ अर्ज स्वत:च्या कक्षाकडे घेण्यास नकार देतात अथवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश घेऊन माहितीच्या अधिकाराचा अर्ज समन्वय कक्षाकडे परत पाठवितात. त्यामुळे समन्वय कक्षातील माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांना प्राप्त अर्जावरील कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करणे कठीण जात आहे.

सबब, **'यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक कक्षातर्फे हाताळण्यात येणाऱ्या विषयांशी संबंधित असेल तर अर्जदारास अंतिमत: एकत्रित स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची जबाबदारी ही माहिती अधिकारी (समन्वय) यांनी निश्चित करुन दिलेल्या संबंधित कक्षाच्या माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांचीच राहील.'** तसेच, **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त अर्जांवरील कार्यवाहीच्या कामकाजाची तातडी लक्षात घेता भविष्यात अर्ज स्वीकारण्यास नकार देणाऱ्या संबंधित कक्षातील माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.**

**(जितेंद भोळे)**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) या सचिवालयातील सर्व अधिकारी.

२) या सचिवालयातील सर्व कक्ष.